




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०९ वा | बुधवार, दि. २५ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सत्तेच्या छत्राखाली भोंदूंचा सुळसुळाट

## प्याद्यावर कारवाई, सूत्रधार मोकाट?

## राज्यातील भोंदूगिरी प्रकरणावर प्रश्नचिन्ह?







**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना पदावरून दूर करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्यानंतर राज्याच्या राजकीय वतुर्ळात नवी चर्चा सुरू झाली आहे. ही कारवाई ह्यचूक दुरुस्तीह्न म्हणून पाहिली जात असली, तरी या प्रकरणाच्या मुळाशी असलेल्या व्यापक प्रश्नांकडे दुर्लक्ष होणार का, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

राज्य महिला आयोगासारख्या संवेदनशील आणि महत्त्वाच्या संस्थेच्या प्रमुखपदी नियुक्ती करताना आवश्यक पात्रता, सामाजिक भान आणि स्त्रीसक्षमीकरणातील योगदान या निकषांचा विचार झाला होता का, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित व्यक्ती पदावर असताना वाद निर्माण झाल्यानंतर त्यांना हटविण्यात आले, मात्र ही कारवाई उशिरा झाल्याची टीका होत आहे.

दरम्यान, या प्रकरणात वादाच्या केंद्रस्थानी असलेले अशोक खरात यांचे नाव समोर आल्यानंतर राजकीय आणि सामाजिक पातळीवर खळबळ उडाली आहे. विविध राजकीय पक्षांतील काही नेत्यांनी त्यांच्या आश्रमाला भेटी दिल्याचे, तसेच त्यांच्या कार्याला अप्रत्यक्ष पाठिंबा दिल्याचे आरोप समोर येत आहेत. यात सत्ताधारी तसेच विरोधी गटातील नेत्यांचाही समावेश असल्याची चर्चा रंगत आहे.

विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांच्यासह काही प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत अशा तथाकथित आध्यात्मिक व्यक्तींशी संबंध जोडले गेल्याचे उदाहरणे दिली जात आहेत. यामुळे राजकीय नेतृत्वाच्या विवेकबुद्धीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, जनतेत चुकीचा संदेश जात असल्याची टीका होत आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारने विशेष चौकशी पथकाची स्थापना केली असून, त्याचे नेतृत्व अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्याकडे देण्यात आले आहे. मात्र, राज्यात यापूर्वीही अनेक गंभीर प्रकरणांत चौकशी पथके स्थापन झाली, पण त्यातून ठोस निष्कर्ष निघाले नाहीत, अशी आठवण विरोधकांकडून करून दिली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, या प्रकरणात केवळ एका व्यक्तीवर कारवाई करून समाधान मानणे योग्य ठरणार नाही. उलट, अशा व्यक्तींना राजकीय व प्रशासकीय पातळीवर मिळालेल्या पाठबळाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा प्रभावीपणे वापरण्याची मागणीही जोर धरत आहे.

याशिवाय आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर प्रवर्तन संचालनालय (ED) आणि केंद्रीय अन्वेषण विभाग (उइक) यांसारख्या केंद्रीय यंत्रणांनीही चौकशी करावी, अशी मागणी पुढे येत आहे. संबंधित व्यक्तींच्या मालमत्तेचा स्रोत, व्यवहार आणि संभाव्य संगनमत यांचा शोध घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

सामान्य नागरिकांना मालमत्ता व्यवहार करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, मात्र अशा प्रकरणांत मोठ्या प्रमाणावर संपत्ती कशी उभी राहते, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. यामध्ये प्रशासकीय यंत्रणेची भूमिका काय होती, याचीही चौकशी अपेक्षित आहे.

दरम्यान, राज्यात अंधश्रद्धेविरोधी कायदा अस्तित्वात असूनही त्याचा प्रभावी वापर होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे हे राज्याचे घटनादत्त कर्तव्य असताना, राजकीय नेतेच अशा प्रवृत्तींचे समर्थन करत असल्याचा आरोप होत आहे.

या सर्व घडामोडींमुळे सध्या एकच प्रश्न उपस्थित होत आहे — ही कारवाई केवळ प्रतीकात्मक ठरणार की खरोखरच व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या समस्यांवर प्रहार होणार?

राजकीय विश्लेषकांच्या मते, या प्रकरणातून पुढे येणारी कारवाई ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी ठरणार आहे. केवळ 'प्याद्यां'वर कारवाई न करता, 'सूत्रधारां'पर्यंत पोहोचले तरच या प्रकरणाला न्याय मिळेल, असे मत व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल निवडणूक शांततेत पार

## सोलापूर जिल्ह्यात उत्स्फूर्त मतदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीची प्रक्रिया शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सोलापूर शहरासह ग्रामीण भागातील वकील बांधवांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये चांगल्या प्रतिसादासह मतदान झाले.

**मिळालेली अधिकृत आकडेवारी अशी..**

बार्शी येथे 550 पैकी 372, मोहोळ येथे 195 पैकी 126, माढा येथे 385 पैकी 248, पंढरपूर येथे 750 पैकी 553, माळशिरस येथे 545 पैकी 361, सांगोला येथे 288 पैकी 212, मंगळवेढा येथे 179 पैकी 118, अक्कलकोट येथे 76 पैकी 44, करमाळा येथे 208 पैकी 140, तर सोलापूर येथे 2445 पैकी 1595 वकीलांनी मतदान केले.

एकूणच, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली असून कोणताही



अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मतदानाच्या टक्केवारीवरून यंदा वकील वर्गामध्ये निवडणुकीबाबत विशेष उत्सुकता आणि जागरूकता दिसून आली.

# भेसळखोरांवर 'मकोका' लावणार!

## नरहरी झिरवाळांची विधान परिषदेत घोषणा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** 'राज्यातील अन्नसुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी तपासणी मोहिमा अधिक व्यापक करण्यात येतील. अन्नपदार्थामध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध कायदा अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल', अशी ग्वाही अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सोमवारी दिली. याविषयी आमदार मनीषा कायंदे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

वर्सोवा पोलिस ठाण्याच्या पथकासह नवजित नगर, अंधेरी (प.) येथे एकूण सात ठिकाणी छापा टाकला असता तेथे अमूल आणि गोकुळ या नामांकित ब्रँडचे लेबल असलेल्या दुधामध्ये भेसळ करण्याचा प्रकार उघडकीस आल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. या प्रकरणात आत्तापर्यंत १४ जणांवर अटक करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. त्यावर आमदार भाई जगताप यांनी, या आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करणार का, असा प्रश्न विचारला. परंतु, मकोकाच्या धर्तीवर एक नवा कायदा येत असल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. मात्र, त्यावर आमदार जगताप आणि अनिल परब यांनी जोरदार आक्षेप घेतला. जीवनावश्यक वस्तूत भेसळ



झाल्यावर जिवावर बेतू शकते हे माहिती असून संघटित गुन्हेगारीवर मकोका का लावता येत नाही, असा प्रश्न विचारला.

त्यावर, कायदेशीर बाबी तपासून अधिवेशन संपण्याआधी खुलासा करू, असे उत्तर झिरवाळ यांनी दिले. त्यावर आमदार परब यांनी आक्षेप घेत, मकोका लावणार की नाही, हे स्पष्ट सांगणार की नाही अशी विचारणा केली. तर, आमदार जगताप यांनी हा प्रश्न पूर्ण महाराष्ट्राला भेडसावणारा असून त्यावर कठोर कारवाई करण्याचे सोडून अधिकाऱ्यांना का वाचवत आहात, १०-१२ बळी गेल्यावर कारवाई करणार का, असा प्रश्न उपस्थित केला. अखेर, विरोधकांकडून प्रश्नांचा भडिमार झाल्यावर मंत्री झिरवाळ यांनी, सभागृहातील सदस्यांची भावना लक्षात घेता भेसळखोरांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे घोषित केले.

तत्पूर्वी, या विभागात अपुरे मनुष्यबळ असल्याचे झिरवाळ यांनी मान्य केले. विभागाच्या २,५४४ मंजूर पदांपैकी केवळ १,२७१ पदे भरण्यात आली असून उर्वरित पदे भरण्याचा प्रस्ताव वित्त विभागाला पाठविण्यात आला होता. परंतु, त्यात काही त्रुटी काढण्यात आल्याने त्यावर कार्यवाही सुरू असल्याचे स्पष्ट केले. तसेच, विभागात पदे वाढविण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याचीही माहिती त्यांनी दिली. भेसळ रोखण्यासाठी भरारी पथकांनी आपले छापे वाढवावेत यासाठी सूचना देण्यात येतील, असे ते म्हणाले. विभागात १९७ कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांना प्रशिक्षणानंतर पदस्थापना देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

**चांगले दूध प्यायलो तरी पचायचे नाही**

'शहरात आणि राज्यात दुधाचे पदार्थ खाण्यासही भीती वाटते', असे आमदार भाई जगताप म्हणाले. 'दुधापासून तयार होणारे पदार्थ खाण्यास मन धजावत नाही हे सांगतानाच, दुधातील भेसळीची इतकी सवय झाली आहे की चुकून चांगले दूध प्यायलो तर पचायचे नाही', असा टोलाही त्यांनी लगावला. अधिकारी-पोलिस यांची यात एक मालिकाच असून त्यांच्या आशीवार्दाने भेसळीचे संगनमत असल्याचा - आरोप त्यांनी केला.

# गावागावात, क्लस्टर स्तरावर शेतमाल खरेदी केंद्रांचे जाळे विस्तारण्यात यावे - खा. मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लोकसभेत शेतकऱ्यांच्या समस्यांवर जोरदार आवाज उठवला. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा यासाठी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे मागणी केली.

खासदार मोहिते पाटील यांनी शेतकऱ्यांची सोय व्हावी यासाठी गावागावात किंवा क्लस्टर स्तरावर खरेदी केंद्रांचे जाळे विस्तारण्याबाबत सरकारचा प्रस्ताव काय आहे, असा प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या संपूर्ण उत्पादनाची योग्य खरेदी व्हावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे मिळून काम करत आहेत. भारतीय खाद्य महामंडळ (FCI), नेफेड (NAFED) आणि राज्य सरकारांच्या विविध एजन्सीमार्फत ही खरेदी प्रक्रिया राबवली जाते. जिथे गरज असेल तिथे नवीन खरेदी केंद्रे उघडली जातील.'

खासदार मोहिते पाटील यांनी यावेळी एक महत्त्वाचा उपप्रश्नही विचारला. टरढ आणि बाजारभाव यांमधील तफावत दूर करण्यासाठी टरढ ला कायदेशीर गॅरंटी देण्याची किंवा 'प्राईस डेफिशियन्सी पेमेंट' (मूल्य तफावत भरपाई) सारखी



प्रणाली लागू करण्याची सरकारची कोणती योजना आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

यावर स्पष्टीकरण देताना मंत्री चौहान यांनी सांगितले की, 'आमच्या सरकारने केवळ गहू आणि तांदूळच नव्हे, तर कडधान्ये, तेलबिया आणि अगदी फळे-भाज्यांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली आहे. पंतप्रधान अन्नदाता आय संरक्षण अभियान (PM-AASHA) सारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांना आधार मिळत असून, त्यांना योग्य भाव मिळवून देण्यात सरकार कोणतीही कसर सोडणार नाही.'

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या या प्रश्नामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांवर केंद्र सरकारचे स्पष्ट धोरण पुन्हा एकदा समोर आले आहे. PM-AASHA योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमी भाव मिळवून देण्याची सरकारची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# सावळेश्वर टोल नाक्यावर चालकाला बेदम मारहाण

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** टोल देण्याच्या कारणा वरून मालट्रक चालक व सावळेश्वर टोल नाक्यावरील कर्मचारी यांच्या झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर मारहाणीत झाले टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी चालकाला बेदम मारहाण करून त्याला गंभीर जखमी केले.

त्याला तातडीने अधिक उपचारासाठी सोलापूर येथील रुग्णालयात दाखल केले आहे. सिद्धू स्वामी वय 32 रा बसवकल्याण असे गंभीर जखमी झालेल्या चालकाचे नाव आहे.

ही घटना मंगळवार ता 24 रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. टोल नाक्यावर राडा झाल्याने दोन्ही बाजूला वाहनांच्या सुमारे दोन किलोमीटर रांगा लागल्या होत्या.

या संदर्भात मिळालेल्या माहिती नुसार, सोलापूर हून पुण्याकडे चालक सिध्दु स्वामी हा मालट्रक घेऊन निघाला होता. त्याची ट्रक सावळेश्वर टोल नाक्यावर आल्यावर टोल नाका कर्मचारी व चालक स्वामी यांच्यात टोल देण्याच्या कारणा वरून बाचाबाची झाली. त्याचे पर्यावसन हाणामारीत होऊन चालक स्वामी याला बेदम मारहाण करण्यात आली.

मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे पाहून स्वामी याच्या अन्य सहकारी चालकांनी टोल नाक्यावर राडा केला, मोठ्या प्रमाणात तोडफोड केली व अघोषित रास्ता रोको केला. त्यामुळे दोन्ही बाजूला





वाहनांच्या रांगा लागल्या.

दरम्यान राज्य राखीव पोलीस दलाला पाचारण करण्यात आले. पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन माळी, वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्ना नंतर वाहतूक सुरळीत झाली. पंढरपुरात चालकाला मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा चालकाला मारहाण झाल्याने चालकात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. रात्री उशिरा पर्यंत या घटनेचा मोहोळ पोलिसात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती.

# सोलापूरातील गणवेश निर्मितीच्या कामाला हिरवा कंदील

## ३५ हजार कामगारांना मिळणार रोजगार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युद्धाच्या परिस्थितीमुळे निर्यात बंद होणे, कच्च्या मालाच्या किमतीत झालेली वाढ यामुळे कापड उद्योगावरील संकट गंभीर झाले होते. अडचणीत आलेल्या सोलापूरच्या या उद्योगाला राज्य शासनाने मोठा दिलासा देत, गणवेश निर्मितीच्या कामाला हिरवा कंदील मिळाल्याने सुमारे ३५ हजार शिलाई कामगारांना रोजगार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मागील दोन वर्षांपासून जिल्हा परिषद शाळांची गणवेश निर्मिती विस्कळीत झाली होती. राज्य शासनाने स्थानिक उद्योगांना काम न देता केंद्रीय पद्धतीने कापड खरेदी करून सोलापूरच्या कापड उद्योगाला अडचणीत आणले होते. त्याचा जबरदस्त फटका हजारो कामगारांना बसला होता.

त्यानंतर या वर्षी नेमके



काय होणार, असा प्रश्न समोर होता. त्यातच जागतिक युद्धाला तोंड फुटले आहे. या युद्धामुळे सोलापूरच्या वस्त्रोद्योगाला मोठा फटका बसला आहे. निर्यातीसाठी तयार असलेला माल शिपमेंट नसल्याने पडून आहे. तसेच नव्या ऑर्डरही मिळेनाशा झाल्या आहेत. त्यातच पेट्रोलियम पदार्थांशी संबंधित कच्च्या मालाचे दर अडीच ते तीनपट वाढले आहेत. त्यामुळे हे संकट दुहेरी झाले आहे.

या स्थितीत आता जिल्हा परिषद शाळांची गणवेश निर्मिती हीच एकमेव आशा कापड उद्योगासमोर उभी होती. मात्र, गणवेश निर्मितीची प्रक्रिया पाच ते सहा महिने आधीपासून करावी लागते. त्यामुळे शासनाचे आदेश वेळेत मिळणे गरजेचे आहे. त्यावर राज्य शासनाच्या शिक्षण खात्याचे राज्य प्रकल्प समन्वयक गोविंद कांबळे यांनी प्राथमिक व महानगरपालिका शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. गणवेशाच्या संदर्भात केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियानाने अद्याप मार्गदर्शक सूचना दिलेल्या नाहीत. मात्र, शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना नवे गणवेश मिळावेत यासाठी आतापासूनच नियोजनाचे संकेत दिले आहेत. तसेच वार्षिक परीक्षा संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या गणवेशाची मापे घेतली जावीत, असे स्पष्ट कळवले आहे. त्यामुळे गणवेश उद्योगांना शिलाईचे काम सुरू करण्याचे संकेत मिळाले आहेत.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# भोंदू राजकारण

गेल्या कित्येक वर्षांच्या कालावधीमध्ये सातत्याने भाषणे गाजवताना व्यासपीठावर महाराष्ट्राला पुरोगामी हे विशेषण दिले जात असले, तरी हे केवळ व्यासपीठ गाजवण्यासाठीच दिले जाते की काय, अशी शंका यावी अशा घटना महाराष्ट्रात सातत्याने घडत आहेत. ज्या महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या आग्रहामुळे बुवाबाजी अंधश्रद्धा विरोधी कायदा झाला, त्याच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आणि सतत बुवा बाबा यांचे फॅड वाढलेले दिसते. अशोक खरात या तथाकथित अध्यात्मिक गुरू आणि भोंदू बाबाच्या ज्या लीला सध्या उघडकीस येत आहेत, त्या पाहता या अध्यात्मिक मार्गदर्शनाच्या नावाखाली महिलांचा लैंगिक छळ केला जात होता हे सहज लक्षात येते. अनेक बाबा आणि बुवा सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूकही करत असतात. आपली संपूर्ण मालमत्ता एखाद्या बाबा किंवा बुवाच्या नावावर करून देणारे भक्तही आढळतात. याच मालिकेतील हा अशोक खरात हा भोंदू बाबा असला तरी या प्रकरणाला राजकीय वलय असल्यामुळे हा विषय आणखी काही काळ तरी पेटता राहील असे दिसते. महाराष्ट्र असो किंवा देशातील इतर राज्य असोत राजकारणी लोक धार्मिकतेचा वापर राजकारणासाठी करतात. ज्या प्रकारे निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकीनंतरसुद्धा आपल्या धार्मिक श्रद्धा असलेल्या ठिकाणी नतमस्तक होण्याचे काम राजकीय नेत्यांकडून केले जाते, ते पाहता राजकीय नेत्यांनी एखाद्या बाबाचे किंवा बुवाचे भक्त होणे ही काही वेगळी गोष्ट मानता येत नाही. राजकारणात असुरक्षिततेचे प्रमाण जास्त असल्यामुळे राजकीय नेत्यांना कोणत्या ना कोणत्या बाबा बुवाचा आशीर्वाद हवाच असतो आणि जेव्हा अशोक खरातसारखा एखादा बाबा समोर येतो तेव्हा हे नेते कोणताही विचार न करता अशा भोंदू बाबांसमोर नतमस्तक होतात. अशा अनेक घटना आजपर्यंत घडल्या आहेत. अशोक खरातच्या घटनेमध्ये महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचा सहभाग आढळल्याने त्यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. आणखीही काही नेते सध्या रडारवर आहेत. खूप वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानी एका वादग्रस्त महाराजांची पाद्यपूजा झाली होती तो विषयही त्याकाळी मोठा गाजला होता. भारतीय संविधानाने सर्वांना आपल्या धार्मिक श्रद्धा जपण्याचे स्वातंत्र्य दिले असले, तरी सामाजिक आणि राजकीय चेहरा म्हणून वावरत असताना आपण या धार्मिक श्रद्धेमध्ये किती वाहवत जायचे याचा विचार राजकीय नेत्यांना करावा लागतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण ज्या बाबा किंवा बुवाच्या नादी लागलो आहोत तो भोंदू आहे का खरोखरच अध्यात्मिक मार्गदर्शन करणारा गुरू आहे यातील फरकही स्पष्ट करता आला पाहिजे. महाराष्ट्रातच नाही तर देशातही अनेक ठिकाणी गेल्या काही वर्षांमध्ये बाबा आणि बुवांचे फॅड वाढत चालले आहे. तो एक समृद्ध व्यवसाय बनत चालला आहे. आधुनिक काळातील असुरक्षितेची भावना आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे तरुणाईपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच कोणत्या ना कोणत्या अध्यात्मिक गुरूच्या आशीवार्दाची गरज वाटू लागली आहे. भोंदू बाबा आणि बुवांना यामध्येच मोठी बाजारपेठ दिसत असल्यामुळे थोडे ज्योतिषविषयक ज्ञान, थोडेफार बोलण्याची क्षमता आणि मार्केटिंगचे ज्ञान या बळाबर अनेक भोंदू अध्यात्मिक महाराज म्हणून उदयाला येऊ लागले आहेत. अध्यात्मिक मार्गदर्शन हा एक व्यवसाय म्हणून विकसित होऊ पहात आहे ही सर्वात चिंतेची गोष्ट आहे. अशोक खरात सारख्या भोंदू बाबांच्या कहाण्या अनेकांना माहीत असतात. या अशा महाराजांच्या आश्रमामध्ये किंवा ठिकाणामध्ये काय काय चालते याची कल्पना अनेकांना असते. पण त्याबाबत कोणीही वेळीच बोलत नाही. जेव्हा एखादी घटना समोर येते तेव्हाच अनुषंगिक घटनाही समोर येतात. वर्षापूर्वीच काही स्थानिक वृत्तपत्रांमध्ये अशोक खरातच्या विरोधात काही बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. पण त्याबाबतही दडपशाहीचे धोरण वापरून या विषयावर पडदा पाडण्याचा प्रयत्न झाला होता. पण आता अशोक खरात आणि त्याच्या काही सहकार्यांना अटक करण्यात आल्यामुळे हा विषय समोर आला आहे आणि प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष पथकाने हा विषय शेवटपर्यंत नेणे गरजेचे आहे. या विषयाला लागलेले राजकारणाचे वलय बाजूला ठेवून संपूर्णपणे या विषयाच्या खोलापर्यंत जाऊन अशोक खरातला शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे झाले तरच भोंदू बुवाबाजीच्या व्यवसायावर नियंत्रण बसू शकेल. अन्यथा ठराविक कालावधीनंतर नवनवीन बाबा बुवा समोर येत राहतील आणि समाजाच्या पिळवणुकीचे विषयही त्याच पद्धतीने पुढे येत राहतील.

# भोंदूबाबा; पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड

कॅप्टन म्हणवून घेणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात या वासनांधांचे विविध लीलांचे तपशील बाहेर येत असल्याने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणाशी संबंधित 58 व्हिडिओ बाहेर पडल्याने आणि जवळपास 100 हून अधिक व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्याने या प्रकरणातील संवेदनशीलता आणि व्याप्ती खूप वाढलेली बघायला मिळत आहे. सामाजिक, राजकीय, प्रशासकीय अशा उच्चभ्रू क्षेत्रातील लोक या भोंदूबाबाचे भक्त असून या भोंदूबाबामुळे त्याच्या भोंदू भक्तांचेही धाबे दणाणले आहेत. या भोंदूबाबच्या चौकशीतून आखणी धक्कादायक गोष्टी समोर येतील ज्याने महाराष्ट्रात आणखी खळबळ माजेल अनेकांचे बुरखे फाटले जातील. या भोंदूबाबावर कठोरात कठोर कारवाई व्हायलाच हवी पण केवळ त्याच्यावरच नव्हे तर त्याच्या भक्तांवर देखील कारवाई व्हायला हवी कारण यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय अवस्थेचे लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. या भोंदूबाबा आणि त्याच्या अंध भक्तांमुळे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अशाप्रकारे भोंदूबाबांचे पेव फुटणे ही एकप्रकारे पुरोगामी महाराष्ट्राची अधोगतीच आहे. भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने समाजातील विवेक, विज्ञाननिष्ठा आणि कायद्याचा वचक पार धुळीस मिसळलेला बघायला मिळत आहे. अर्थात याला आपले राजकीय नेतेही तितकेच जबाबदार आहेत. संविधानाची शपथ घेऊन आमदार, खासदार, मंत्री बनणारे आमचे नेते अशा भोंदूबाबांच्या कच्छपी लागत असेल तर या भोंदूबाबांवर कायद्याचा वचक कसा राहील? ज्या नेत्यांनी समाजासमोर आपल्या वर्तणुकीतून आदर्श निर्माण करायचा असतो तेच नेते तर जर अशा भोंदूबाबांचे पाय धुवत असतील तर भोंदूबाबांना कायद्याचा धाक कसा राहील ? जादूटोणाविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्यासाठी डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी हौतात्म्य पत्करले. आजची परिस्थिती पाहिली तर डॉ नरेंद्र दाभोळकर यांचे हौतात्म्य वाया गेले की काय ? असा प्रश्न पडतो कारण ज्या कायद्यासाठी त्यांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले त्या कायद्याचे अस्तित्वच आज कोठे दिसत नाही. आज 21 व्या शतकातही लोक अंधश्रद्धेच्या किती आहारी गेले आहेत ते या प्रकरणाने दाखवून दिले आहे. अजूनही लोकांना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक समजत नाही. अध्यात्माच्या नावाखाली लोक अशा भोंदूबाबांच्या नादी लागतात आणि स्वतःसह समाजाचेही नुकसान करून घेतात. लोकांच्या श्रद्धेचा (अंध) बाजार मांडून अशोक खरात सारखे भोंदू बाबा कॅप्टन फाईल बनवतात. अर्थात अशी फाईल असलेला अशोक खरात हा एकमेव भोंदूबाबा नाही. गावागावात, शहरशहरात असे अनेक भोंदूबाबा आहेत जे भक्तांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन आपल्या तुंबड्या तर भरतच आहेत पण महिला भगिनींच्या अब्रूही लुटत आहेत. अशोक खरात प्रमाणेच श्रद्धेचा बाजार मांडून भक्तांना लुबाडणाऱ्या गावागावातील या भोंदूबाबांची देखील छाटणी करायला हवी. आज हा खरात आहे, उद्या दुसराच कोणी... उभा राहील ? तेंव्हा थोतांड प्रवृत्तीच्या या भोंदूबाबांचा बीमोड होणे आवश्यक आहे त्यासाठी जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवीच त्याशिवाय लोकांनीही आपला विवेक जागृत ठेवून अशा भोंदूबाबांच्या नादी लागणे सोडून द्यावे. भोंदूबाबा म्हणजे पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड आहे ही कीड मुळापासून उपटून टाकायलाच हवी.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## ‘मिशन लक्ष्यवेध’अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी निवड चाचण्या जाहीर

**मुंबई(कटूसत्य वृत्त):-** क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत ‘मिशन लक्ष्यवेध’ अंतर्गत मुंबई विभागीय क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडूंची निवड प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेल्या २५ वर्षाखालील खेळाडूंनी ३१ मार्च २०२६ पर्यंत यावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे, असे आवाहन मुंबई शहरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिले आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश राज्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी घडवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत वेटलिफ्टिंग, लॉन टेनिस, शूटिंग व टेबल टेनिस या क्रीडा प्रकारांसाठी विभागीय स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान तज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळाडूंचे कौशल्य परीक्षण करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शन दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी ई-मेल : missionlakshvedhamumdiv@gmail.com यावर संपर्क साधावा.

तालुका क्रीडा संकुल, कोपरी, ठाणे येथे ६ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकाराची निवड चाचणी होणार असून, अधिक माहितीसाठी हिमानी परब ८३९११९६४०४६ यांना संपर्क साधावा. महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, कुपरेज क्लब, मुंबई येथे ७ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता लॉन टेनिस क्रीडा प्रकारची निवड चाचणी होणार असून अधिक माहितीसाठी प्रीती टेमकर ९०२२२५०७५८ यांच्याशी संपर्क साधावा. शूटिंग क्रीडा प्रकाराची निवड चाचणी कामगार कल्याण मंडळ, दादर, येथे ०८ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वा. होणार असून, अधिक माहितीसाठी नेहा साखरे ९८६९११९७०२२ यांना संपर्क साधावा.

टेबल टेनिस क्रीडा प्रकाराची निवड चाचणी नवी मुंबई स्पोर्ट्स अँड सामाजिक विकास मंडळ, पनवेल येथे ०९ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वा होणार असून, श्री. नीलकंठ आवाडे ९१६७३१७०८२ यांच्याशी संपर्क साधावा. अजासीबत जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट व पालक संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. निवड चाचणीच्या दिवशी मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रोहा येथील कामगारांवर अन्याय होऊ नये नियमाप्रमाणे वेतन द्यावे - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई(कटूसत्य वृत्त):-** रोहा येथील युनिकेम लॅबोरेटरीज लिमिटेडमध्ये कार्यरत स्टाफ कामगारांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, यासाठी कंपनीने नियमांचे पालन करून वेतन अदा करावे, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.



रोहा येथील कामगारांच्या विविध समस्यांबाबत आज मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस माजी आमदार अनिकेत तटकरे, कंपनीचे अधिकारी तसेच कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या कामगारांवर कोणताही अन्याय होऊ नये. कंपनीने कोणतेही निर्णय घेताना कामगारांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घ्यावा तसेच कामगारांशी समन्वय साधूनच धोरणे राबवावीत. कामगारांना नियमानुसार वेतन अदा करणे आवश्यक असून त्यात कोणतीही कपात किंवा विलंब होऊ नये. याशिवाय, कामगारांना मिळणाऱ्या आजारपणातील रजांमध्ये कपात करू नये. स्थानिक कामगारांची गैरसोय होऊ नये यासाठी त्यांची इतरत्र बदली करू नये, असे निर्देशही मंत्री तटकरे यांनी दिले

## जल संदेश पत्रकाचे मुंबईत राहुल नार्वेकरांच्या हस्ते प्रकाशन

**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जलसंसाधन संस्था, नागपूर केंद्र आणि लोकवाहिनी समूहातर्फे दरवर्षी १६ ते २२ मार्च या काळात जलजागृती सप्ताह साजरा केला जातो. या निमित्ताने विदभार्तील अनेक शासकीय, निशासकीय संस्था, शाळा, महाविद्यालये, ज्येष्ठ नागरिक मंडळे आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये पाणी जपून वापरण्याची, पाण्याची काटकसर करण्याची, पाण्याचा अपव्यय टाळण्याची तसेच पाण्याचा गैरवापर न करण्याची जल प्रतिज्ञा घेतली जाते. दरवर्षी १ ते ३ लाख विद्यार्थी, नागरीक जलप्रतिज्ञा घेतात.



यंदा या उपक्रमात सुमारे ३ लाख नागरिकांसह शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिज्ञा घेणार आहेत. याबाबतच्या जल संदेश पत्रकाचे आज मुंबईत विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते विधानभनातील त्यांच्या कक्षात प्रकाशन करण्यात आले आणि जलाजागृती सप्ताहाचा शुभारंभही करण्यात आला. यावेळी भारतीय जलसंसाधन संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण महाजन, विशाल परब उपस्थित होते.

भारतीय जलससंसाधन संस्था आणि लोकवाहिनीच्या संयुक्त उपक्रमाचे विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कौतुक केले. पाण्याच्या दुर्भीक्षाबाबत बोलताना ते म्हणाले, आज पाणी वाया जाईल तर तहान उद्या जीव घेईल, तेव्हा सर्वांनी पाणी जपून वापरावे असा संदेशही राहुल नार्वेकर यांनी दिला. जनतेने नैसर्गिक प्रवाह, जलाशय, कालवे आणि पाणीपुरवठ्याच्या पायभूत सुविधांचे रक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. जनतेने स्वतःहून जल प्रतिज्ञेच्या उपक्रमात सवार्नी सहभागी होऊन जलसंचयाचे महत्त्व पटवून द्यावे आणि नव्या पिढीपुढे आदर्श ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेतर्फे जलजागृती सप्ताहानिमित्त चित्रकला, निबंध स्पर्धा, जलशपथ सेल्फी स्पर्धा सोबत, २० मार्चला नागपुरात वॉटर रनही घेण्यात होणार असल्याचे यावेळी डॉ. प्रवीण महाजन यांनी सांगितले.

## महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार सोहळा मुंबईत २५ व २६ मार्च रोजी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे देण्यात येणारा महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरण सोहळा २५ व २६ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे संपन्न होणार असल्याची माहिती प्रादेशिक उपायुक्त, बाळसाहेब सोळंकी यांनी दिली.

२५ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता गेटवे ऑफ इंडिया ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह दरम्यान व्यसनमुक्ती दिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर उद्घाटन सोहळा, व्यसनमुक्ती विषयावरील विविध चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात आले आहे. तसेच, २६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता पुरस्कार वितरण सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पार पडणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे तसेच विभागाच्या आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०० व्यक्ती आणि १३ संस्थांना महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. यामध्ये लेखक, कवी, पत्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी आणि सेवाभावी संस्थांचा समावेश आहे.

## महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासासाठी केंद्राकडून ४१० कोटी

**नवी दिल्ली (कटू वृत्त सेवा):** महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने पंधराव्या वित्त आयोगांतर्गत ४१० कोटींपेक्षा अधिक निधी वितरित केला आहे. हा निधी प्रामुख्याने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून विकासकामांसाठी वापरला जाणार आहे.

केंद्र सरकारने हा निधी ‘टाइड’ आणि ‘अनटाइड’ अशा दोन स्वरूपात उपलब्ध करून दिला आहे. २०२२-२३ मधील पहिल्या हप्त्यातील रोखलेला १०४.०४ कोटी आणि दुसऱ्या हप्त्यातील १२०.६१ कोटी असा एकूण निधी टाईड अंतर्गत १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्या आणि ५० ग्रामपंचायतींना दिला आहे.

२०२३-२४ मधील पहिल्या हप्त्यातील १०६.२० कोटी आणि दुसऱ्या हप्त्यातील ७९.१३ कोटी निधी अनटाइड अनुदानाच्या माध्यमातून वितरित करण्यात आला आहे.

‘अनटाइड’ निधीचा वापर ग्रामपंचायतींना त्यांच्या स्थानिक गरजांनुसार कोणत्याही विकासकामांसाठी करता येईल. टाइड या निधीचा वापर प्रामुख्याने स्वच्छता आणि हागणदारी मुक्त गाव मोहीम, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन, पावसाचे पाणी साठवणे आणि पाण्याचा पुनर्वापर करणे यासाठी वापरता येणार आहे.

## ज्येष्ठ शिवसैनिक तुकाराम (नाना) मस्के यांचे निधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे माजी परिवहन सभापती आणि शिवसेनेचे निष्ठावान उपजिल्हाप्रमुख तुकाराम (नाना) मस्के यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या काही काळापासून ते कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांच्या निधनामुळे सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वस्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.



### संघटनेचा खंदा आधारस्तंभ हरपला

तुकाराम मस्के हे शिवसेनेतील एक ज्येष्ठ आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळखले जात. त्यांनी संघटनेच्या वाढीसाठी आणि संघटनात्मक बांधणीत मोलाचे योगदान दिले होते. सोलापूर महानगरपालिकेत परिवहन सभापती म्हणून त्यांनी प्रभावी काम केले होते. शिवसेना उपजिल्हाप्रमुख म्हणून काम करताना त्यांनी अनेक जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावले. नाना मस्के यांच्या पश्चात त्यांच्या मागे मोठा परिवार आणि मित्रपरिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच राजकीय नेत्यांनी आणि शिवसैनिकांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली.

## २७ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर यांच्या विद्यमाने आयोजित या मेळाव्यात जिल्ह्यातील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय (वेल्डर, फिटर), डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रिशियन, मशिन ऑपरेटर, बी.कॉम, एम. कॉम अशा विविध शैक्षणिक पात्रतेनुसार एकूण १४५ पेक्षा जास्त रिक्तपदे उपलब्ध असून, ती ८ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचित केली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपला रिज्युमेच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट पार्क चौक, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२१७-२९९२९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा. तसेच उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट देऊन अधिक माहिती मिळवावी, असे सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता संगीता खंदारे यांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हुतात्मा स्मृती मंदिर येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत आयोजित जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे उद्घाटन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. महोत्सवात सेंद्रिय गूळ, काकवी, मंगळवेढा ज्वारी, सोलापुरी हुरडा व जांभूळ कुल्फी, ज्वारी बिस्किटे, केळी व शेवगा पावडर, मध, वाळवण पदार्थ, ड्रायर भाजीपाला, मल्टीमिलेट आटा व कडक भाकरी यांसारख्या खाद्यपदार्थांचे एकूण 46 स्टॉल उभारण्यात आले आहेत. तसेच कृषि विभागामार्फत उत्कृष्ट फळे व फुलांचे नमुनेही प्रदर्शित करण्यात आले. या स्टॉलद्वारे पहिल्याच सत्रात 55,000 रुपयांची विक्री झाली. सदर महोत्सवात कृषि विभागाच्या विविध योजनांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तसेच रब्बी पिक स्पर्धा 2024 मधील विजेत्या महिला शेतकऱ्यांचा, थेट विक्री करणाऱ्या हुरडा उत्पादक शेतकऱ्यांचा आणि विक्रमी उत्पादन घेणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी राहीबाई पोपरे यांनी देशी बियाणे, पारंपरिक वाणांचे संवर्धन तसेच दुर्मिळ होत चाललेल्या स्थानिक प्रजातींचे जतन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महोत्सवाला सोलापूर शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यानंतर तांत्रिक सत्रामध्ये पौष्टिक तृणधान्य व भरडधान्य लागवड तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, विपणन व विक्री व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. कार्यक्रमास दत्तात्रय गावसाने (विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग), राजीव मराठे (संचालक, डाळिंब संशोधन केंद्र), लालासाहेब तांबडे (प्रमुख शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र), बसवराज रायगोंडा (प्रमुख शास्त्रज्ञ, ज्वारी संशोधन केंद्र, सोलापूर), तसेच शुक्राचार्य भोसले (जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सोलापूर), अभिजीत घेडे (कृषि उपसंचालक, सोलापूर) यांच्यासह कृषि विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा महोत्सव दि. 23 मार्च ते 25 मार्च 2026 या कालावधीत दररोज सकाळी 10.00 ते रात्री 9.00 या वेळेत आयोजित करण्यात आला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

### वात्रटिका

**भोग आणि योगायोग**

कसे सांगू,काय सांगू
किती घेऊ आणाभाका...
दारात अडकला हात आणि
जखमी झाली अनामिका...
जखमी तुझे बोट,माझे बोट
हा सारा योगायोग आहे...
जडलेला रोग,बाबांचा योग
आणि आपला भोग आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी राज्यात अभिनव उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभे राहिले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री सत्य साई संजीवनी केंद्रामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे विविध जिल्हा रुग्णालयांमध्ये हृदयरोग तज्ज्ञांकडून एकूण २,५०७ टू-डी-इको तपासण्या करण्यात आल्या. तसेच जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी राज्यभरातील आरबीएसके पथकांमार्फत ३२२६ बालकांवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र येथे उपचार करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार श्री सत्य साई संजीवनी केंद्रांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि सातारा जिल्ह्यातील जावळी या आदिवासी बहुल



तालुक्यांना दत्तक घेऊन तेथे विशेष आरोग्य उपक्रम राबविले. तसेच पुण्यातील शहरी झोपडपट्टूयांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यात येत आहेत.

विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये बालकांमधील जन्मजात हृदयरोग तपासणीसाठी मेगा शिबिरे सुरू असून, दुर्गम भागातील बालकांनाही अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत.

नवी मुंबई येथे बांधकाम कामगार तसेच वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांसाठी नॉन-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) आणि कर्करोग तपासणी प्रकल्पही सुरू करण्यात आला आहे.

याशिवाय, आजपर्यंत आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी अशा ३५०० हून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.


## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

अस्लम सत्तार मुजावर
वय ३६ वर्षे. व्यवसाय नोकरी
रा. कोरवली ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**
**विरूद्ध**
ग्रापंचायत पेनूर ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचाअस्लम सत्तार मुजावर यांचा जन्म दि.१७/७/१९८८ रोजी पेनूर ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.तारखे अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे अस्लम सत्तार मुजावर यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे 'नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै १९८८ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.८/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २५/३/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

प्रसन्न हेमंत लोखंडे
वय-२९ वर्षे. धंदा-मजुरी
रा. मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर } **अर्जदार**
**विरूद्ध**
मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची आईची आई मंगल दत्तात्रय कळसे मृत्यू दिनांक-५/९/२०२४ रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची आजी मंगल दत्तात्रय कळसे रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेबर २०२४ चे आभिलेखात अर्जदार यांची आजी यांची मृत्यूनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.५/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे मृत्यू दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धीकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २५/३/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

**जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निवीदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि.१८/१०/२०२३**
**परिशिष्ट-३**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक २, सोलापूर यांचे कार्यालय**
**मोहिते नगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर-४१३००३**
**दुरध्वनी क्रमांक - ०२१७-२७४०६६० ई-मेल पत्ता:- eebdd2solapur@gmail.com**
**ई-निविदा सूचना क्रमांक ३९ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये कांही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | उजनी डावा कालवा वितरिका क्र.३८ वरिल कि.मी. १ ते २१ मध्ये अस्तरीकरण दुरुस्तीचे काम जि.सोलापूर करणे सन-२०२५-२६. | रु.२१०,९९,५८२/- | सोलापूर |

१. निविदा उपलब्ध कालावधी :- दि. २५.०३.२०२६ ते दि. ०१.०४.२०२६
२. निविदा उघडण्याचा दिनांक :- दि.०६.०४.२०२६ रोजी सकाळी- १०:०० वा. (तांत्रिक लिफाफा)

जा.क्र. भीविवि-२/लेशा-४/१०६५/२०२६
भीमा विकास विभाग क्र. २,
सोलापुर दि. २०/०३/२०२६

**सही/- (प्र.पां.कडुसकर)**
**कार्यकारी अभियंता**
**भीमा विकास विभाग क्र.२,सोलापूर**

डीजीआयपीआर-आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी६७६५

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी**
**ई निविदा सूचना क्रमांक ४० सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम नोंदणीकृत सोलापूर जिल्हयातील मजूर सह सोसायटी यांचेकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | सांगोला कालवा सा. क्र. १८/४०० येथे थेट विमोचक बांधणे. | रु.२१,१८,३२०/- | सोलापूर |

ई निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २५.०३.२०२६ ते ०१.०४.२०२६
ई निविदा उघडण्याचा दिनांक:- दिनांक ०२.४.२०२६
१. पत्र व्यवहारासाठी कार्यालयाचा पत्ता - कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी ता.कराड जि. सातारा, दुरध्वनी क्र. ०२१६४-२७१३२७, ई-मेल- eetlimd@gmail.com
२. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या संकेतस्थळावर उपलबध आहे.

जा.क्र. टेंऊसिप्रव्यवि/लेशा-३/ / २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग ओगलेवाडी दिनांक :- १८.०३.२०२६

**सही/- इंजि. रा. पां. डवरी**
**कार्यकारी अभियंता,**
**टेंभू उपसा सिंचन प्रकल्प**
**व्यवस्थापन विभाग,ओगलेवाडी**

जिमाका/सो/जाहि/४०५/२०२५-२६


# आयुष्यमान आरोग्य अभियान मोहिमेचे जंगम यांच्या हस्ते उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक क्षयरोग दिना निमित्त सोलापूर जिल्हयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आयुष्यमान आरोग्य अभियान 100 दिवसाच्या विशेष मोहिमेचे उद्घाटन कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते निक्षय मित्रांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आणि क्षयरुग्णांना पोषण आहार किट (फूड बास्केट) वितरित करण्यात आले. मार्डी येथे संशयीतांचे एक्स-रे काढण्यात आले आणि जिल्हाभरात रॅली, रांगोळी स्पर्धा, आयुष्यमान आरोग्य शिबिरे अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करून क्षयरोगाविषयीची जनजागृती करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भारत देश क्षयमुक्त करण्याची शपथ दिली आणि चालू वर्षांमध्ये जास्तीत जास्त संशयतांना तपासून




त्यांना उपचाराखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

समाजातील विविध घटकांना, नागरिकांना, संस्थांना, औद्योगिक क्षेत्रातील यांना रुग्णांना फूड बास्केट देण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. मोहन शेगर, सहसंचालक कुष्ठरोग, डॉ. एवळे, तालुका आरोग्य अधिकारी उत्तर, डॉ. निलम घोगरे, तालुका आरोग्य अधिकारी दक्षिण, डॉ. विनोद अभिवंत , डॉ. सरोज बनसोडे, श्रीमती वैशाली थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक, राजेंद्र पतंगे, सांख्यिकी अनिवेक्षक, मशाक मुजावर, कनिष्ठ लिपिक, अंटद, आरोग्य सहाय्यक, विजय शेगर, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, राजकिरण भूताळे, जिल्हा पीपीएम समन्वयक, सोमनाथ गायकवाड, डॉट प्लस सुपरवायझर, सचिन भंडारे, लेखापाल, चौधरी, वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक, निश्चय मित्र व क्षयरूग्ण आदि उपस्थित होते.


**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
e-mail : mohsolapur@gmail.com

जा.क्र/आ.अ./१६१७

**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

आरोग्य खाते अंतर्गत डी. एस. विभागासाठी जंतुनाशक व किटकनाशक औषध टेमिफॉस ५०% EC ची खरेदी करणे

अनुक्रंमाक - ३२९२

वर नमुद कामाचे टेंडर सोमनपाच्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर पासून दि.२०/०३/२०२६ ते दि.२४/०३/२०२६ पर्यंत दुपारी १ वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**(डॉ. राखी सुहास माने)**
**आरोग्याधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**


# पाण्यावरून भाऊबंदकी पेटली! कोयत्याने जीवघेणा हल्ला

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** 'पाणी अडवा, वाद वाढवा' म्हणत माढा तालुक्यातील वेणेगाव येथे सख्ख्या भावांमध्ये पाण्याच्या वादातून थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत प्रकरण पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेत कोयत्याने वार करून भावाला गंभीर जखमी करण्यात आले असून तिघांविरुद्ध टेंभुर्णी

## तिघांविरुद्ध गुन्हा

पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनिल लक्ष्मण जठार (वय 36, व्यवसाय शेती, रा. जठार वस्ती, वेणेगाव, ता. माढा) यांच्या शेतातील सामाईक पाण्याच्या पाईपलाईनवरून हा वाद पेटला. दि. 22 मार्च 2026 रोजी दुपारी सुमारे 12.30 वाजण्याच्या सुमारास पाण्याचा कॉक बंद करण्याच्या कारणावरून दोन्ही भावांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. 'रक्ताच्या नात्यालाच पाणी पाजणारा' असा हा वाद चिघळत गेला आणि संतापाच्या भरात लहान भाऊ महादेव लक्ष्मण जठार (वय 34) याने हातातील कोयत्याने सुनिल जठार यांच्या मानेवर व डाव्या हातावर सपासप वार केले. या हल्ल्यात सुनिल जठार गंभीर जखमी झाले. इतकेच नव्हे, तर आरोपीची पत्नी धनश्री महादेव जठार (वय 30) व मुलगा आर्यन महादेव जठार (वय 16) यांनीही शिवीगाळ, दमदाटी करत हाताने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी व त्यांच्या पत्नीला दुखापत झाली असून, 'जिवे मारण्याचा प्रयत्न' केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. जखमी अवस्थेत सुनिल जठार यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असल्याने तक्रार देण्यास विलंब झाला.

अखेर दि. 23 मार्च रोजी पहाटे 3.45 वाजता टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 169/2026 नोंदविण्यात आला. या प्रकरणी बीएनएस कलम 109, 95, 115(2), 352, 351(3), 3(5) तसेच शस्त्र अधिनियम कलम 4 व 25 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, हल्ल्यासाठी वापरलेले हत्यार कोयता असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. 'थेंबाथेंबातून सागर भरतो, पण त्याच पाण्यावरून वाद पेटल्यास नातेसंबंधांची राख होते,' अशी चर्चा गावात रंगली असून या घटनेमुळे वेणेगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे करीत असून, अंमलदार पोसई/मदने यांनी गुन्हा दाखल केला आहे.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळया समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 209



# चिंचोलीकाटी एमआयडीसीतील कंपन्यांवर कारवाईची मागणी



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त) :-** मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी एमआयडीसी परिसरात अवैध मुरूम उत्खनन करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या प्रकरणी संबंधित कंपन्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आमदार राजाभाऊ खरे यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात केली. आमदार खरे यांनी विधानसभेत हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित करत सांगितले की, चिंचोलीकाटी परिसरातील काही कंपन्यांकडून बेकायदेशीररित्या मुरूम उपसा करण्यात आला आहे. या उत्खननासाठी शासनाकडे कोणतीही रॉयल्टी जमा करण्यात आलेली नसून, त्यामुळे शासनाच्या तिजोरीला मोठा महसुली फटका बसला आहे.

ते पुढे म्हणाले की, संबंधित कंपन्यांनी तीस ते तीस फूट खोल असे तीन तलाव खोदून त्यातील मुरूम स्वतःच्या वापरासाठी घेतला आहे. या प्रकरणात शासनाकडे रॉयल्टी वसूल केली जाणार का आणि बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे दाखल होणार का, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, या गंभीर आरोपांची दखल घेत महसूल मंत्री बावनकुळे यांनी दोन दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आता प्रशासन कोणती कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भोंदू खरात प्रकरणावरून कॉंग्रेस आक्रमक; निष्पक्ष चौकशीची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर महिला कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या या गंभीर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

महिला कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचारांबाबत नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली. नाशिकमधील या प्रकरणामुळे महाराष्ट्रासह देशभरात संतापाची लाट उसळली असून, अशोक खरात या स्वघोषित 'कॅप्टन' व ज्योतिषाने महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत.

महिलांना भविष्य सांगण्याच्या नावाखाली धमकावून त्यांचे शोषण करण्यात आले, तसेच आक्षेपार्ह व्हिडिओ तयार करून ब्लॅकमेलिंग केल्याचेही समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला कॉंग्रेसतर्फे निदर्शने करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात माजी नगरसेविका भारती इप्पलपल्ली, माजी महिला अध्यक्षा हेमा चिंचोळकर, सुमन जाधव, ॲड. करीमुन्निसा बागबान, कोंडण काकडे, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, पूजा चव्हाण, मुमताज शेख, निर्मला कांबळे, अनिता भालेराव, मीना गायकवाड, जयश्री स्वामी, रंजना गायकवाड, श्रीमंतीबाई बनसोडे आदी महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



**तपास पारदर्शकपणे व्हावा : तुपलवंडे**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मोठ्या प्रमाणावर महिलांचे शोषण झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे तपास वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक पद्धतीने करण्यात यावा, अशी मागणी सोलापूर शहर महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे यांनी केली.

तसेच, सर्व पुराव्यांची सखोल चौकशी करून पीडितांना संरक्षण व न्याय द्यावा, संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि आरोपीशी संबंध असलेल्या लोकप्रतिनिधींवरही कारवाई करण्यात यावी. महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याचीही गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक संपन्न



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भारताचे संविधान निमार्ता, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी 14 एप्रिल 2026 रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त रखुमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पंढरपूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते. जयंती निम्मित शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, सहा.पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी. वाय.मुजावर, रेखा घनवट, सहा. पोलीस निरिक्षक योगेश लंगुटे, नगर अभियंता श्री केसकर, महावितरणचे अधिकारी तसेच शहरातील व तालुक्यातील जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकर्ते व पोलीस पाटील उपस्थित होते. या बैठकीत डॉ. आंबेडकर जयंती डिजेमुक्त, शांततामय आणि उत्साही वातावरणात साजरी करावी. जयंती अनुषंगाने लावण्यात येणारे पोस्टर, बॅनर , झेंडे हे परवानगी घेऊन व योग्य ती खबरदारी घेऊन लावावे तसेच ते आक्षेपार्ह असु नयेत याची दक्षता घ्यावी, मिरवणूक काढण्यापूर्वी किमान तीन दिवस अगोदर परवाना घेणे बंधनकारक आहे. मंडळानी पारंपरिक वाद्याचा वापर करावा तसेच सामाजिक उपक्रम राबवावेत अशा मंडळांना पोलीस प्रशासनातर्फे पारितोषिक देण्यात येणार आहे. आगामी जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकीचा मार्ग, सार्वजनिक कार्यक्रमांचे नियोजन, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच पोलिसांना सहकार्य करण्याबाबत उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जयंती मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचा उत्साह



**करमाळा (कटूसत्य वृत्त):** दत्तकला शिक्षण संस्था संचलित दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये 'ट्रेंडस इन मॅनेजमेंट अँड इंजिनिअरिंग स्ट्रीम्स' या विषयावर पहिली आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेस भारतासह फिलिपाईन्स, इंडोनेशिया व तैवान येथील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ, संशोधन विद्वान तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. परिषद संयोजक डॉ. एस. एस. बेरे यांनी प्रास्ताविकात परिषदेची उद्दिष्टे स्पष्ट करताना संशोधन, नावीन्य आणि व्यवस्थापन व अभियांत्रिकी क्षेत्रातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी संचालक प्रा. श्रीकांत साळुंके, डॉ. शरद कर्णे, प्राचार्य डॉ. संभाजी पाटील, प्रा. राजेंद्र वाबळे तसेच विविध विभागप्रमुख उपस्थित होते. राजेंद्र गंगार्डे यांनी मार्गदर्शन करताना संशोधन, नवोपक्रम आणि तांत्रिक प्रगतीची गरज अधोरेखित केली.

संचालक प्रा. श्रीकांत साळुंके यांनी आंतरराष्ट्रीय परिषदांचे महत्त्व विशद करत संशोधन व शैक्षणिक सहकार्य वाढीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता व्यक्त केली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी शिक्षण, संशोधन व नावीन्य यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या संस्थेच्या ध्येयावर प्रकाश टाकला. सचिवा माया झोळ तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर यांनीही बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर संशोधन व नवोपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.

परिषदेत विविध तांत्रिक विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले. डॉ. कॅथलीन एबोरा पॅड्रिगालन यांनी पवनचक्की देखभालीसाठी उभ्या पृष्ठभागावर चढणाऱ्या रोबोटच्या प्रोटोटाइपवर सादरीकरण केले. डॉ. द्वी सुदान पुत्रा यांनी आधुनिक मोटर प्रणाली व स्मार्ट तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी डॉ. मायसेल ए. कॅपिलायन यांनी जैवसंकेत विश्लेषण व मानवी आरोग्य या विषयावर सखोल माहिती दिली, तर डॉ. फिरोज इस्माईल मुलाणी यांनी 'नेट झिरो एनर्जी बिल्डिंग' संकल्पनेवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा माया झोळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अवकाळी पावसाचा जिल्ह्याला फटका

## ९४ गावे बाधित, ६९० हेक्टरवरील पिकांचे नुकसान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने शेती क्षेत्राला मोठा फटका बसला असून एकूण ९४ गावे बाधित झाली आहेत. सुमारे ६९० हेक्टरवरील पीकक्षेत्राचे नुकसान झाल्याची प्राथमिक नोंद कृषी विभागाने केली आहे. हा अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

१७ ते २० मार्च दरम्यान सोलापूर शहरासह ग्रामीण भागात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अक्कलकोट, उत्तर सोलापूर, सांगोला आदी तालुक्यांमध्ये काही ठिकाणी गारपीटही झाली. या पावसाचा सर्वाधिक फटका अक्कलकोट तालुक्याला बसला असून तेथील ४२ गावे बाधित झाली आहेत. सांगोला तालुक्यात २६ गावे, माढा तालुक्यात १० गावे, मंगळवेढा तालुक्यात ५ गावे, तर उत्तर सोलापूर तालुक्यात ८ गावे बाधित झाली आहेत. पंढरपूर व करमाळा तालुक्यांत प्रत्येकी एका गावाची नोंद आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील १ हजार १९३ शेतकरी प्रभावित झाले आहेत. तसेच ४ लहान व ६ मोठी जनावरे दगावली असून सांगोला तालुक्यात सर्वाधिक ७ जनावरांचा मृत्यू झाला आहे. मोहोळ तालुक्यात २ तर करमाळा तालुक्यात १ जनावर दगावल्याची नोंद प्रशासनाने केली आहे.

दरम्यान, द्राक्ष, आंबा, केळी, डाळिंब, गहू, ज्वारी, हरभरा, मिरची, खरबूज व कलिंगड या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यात २२७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून अक्कलकोट तालुक्यात २८९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. माढा तालुक्यात ५८ हेक्टर तर सांगोला तालुक्यात ११३ हेक्टर क्षेत्र प्रभावित झाले आहे.

नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करण्याचे काम सध्या सुरू असून अंतिम अहवाल सादर झाल्यानंतर शेतकऱ्यांना शासनाकडून मदत दिली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# नाटक प्रत्यक्ष आयुष्याशी जोडते- संजय हळदीकर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आजच्या डिजिटल युगात मुलं मोबाईलमध्ये रमून जात आहेत पण नाटकासारखी कला त्यांना प्रत्यक्ष आयुष्याशी जोडते.संवाद कौशल्य, शरीर भाषा आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी नाटक अत्यंत उपयुक्त आहे असे मत कोल्हापूरचे प्रसिद्ध दिग्दर्शक संजय हळदीकर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा अकलूज शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग,शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड टेक्नॉलॉजी, अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने नाटकांची परंपरा नव्या पिढीला माहिती होण्यासाठी जिथे शाळा, कॉलेज तिथे रंगमंच हा एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हा परिषद किल्ला शाळा अकलूज येथे करण्यात आला.या शुभारंभाप्रसंगी संजय हळदीकरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी अमीत पुंज, लाला मुजावर, नितीन बनकर, नागन्नाथ साळवे, केदार लोहकरे, सयाजी मगर, मोतीराम वाघमोडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. शुभारंभा दिवशी जि.प.शाळा शंकरनगर, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल शंकरनगर या ठिकाणीही शुभारंभाचा प्रयोग करण्यात आला.

हळदीकर म्हणाले,नाटक ही केवळ मनोरंजनाची गोष्ट नाही तर ती जीवन समजून घेण्याची एक प्रभावी कला आहे. 'जिथे शाळा, कॉलेज तिथे रंगमंच' हा उपक्रम मुलांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि अभिव्यक्तीची ताकद वाढवणारा आहे.लहान वयातच मुलांनी नाटकाच्या माध्यमातून विचार मांडायला शिकले, तर ते भविष्यात अधिक संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनतील.नाटक करताना टीमवर्क, शिस्त आणि वेळेचे महत्त्व समजते.

प्रत्येक भूमिकेला महत्त्व असते.त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने या कलेचा अनुभव घ्यावा.भीती बाजूला ठेवून रंगमंचावर या स्वतःला व्यक्त करा आणि या सुंदर कलेचा आनंद घ्या.शिक्षकांनीही अशा उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, कारण यातूनच उद्याचे उत्तम कलाकार आणि जागरूक नागरिक घडतील.

या कार्यक्रमासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सौ. शितलदेवी मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले असून प्रत्यक्ष नियोजन आणि संकल्पना आणि यशस्वी आयोजनासाठी अभिनेते अजय तपकिरे,सुनील कांबळे, डॉ.विश्वनाथ आवड,अमित पुंज, औदुंबर भिसे हे परिश्रम घेत आहेत.

# प्रशासकीय काळातील कामांची माहिती चार दिवसांत सादर करा; जिल्हा परिषद प्रशासनाला आदेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेचे नूतन अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासनाला कामकाजात गती देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. प्रशासकीय काळातील सर्व विभागांच्या कामांची सविस्तर माहिती पुढील चार दिवसांत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सोमवारी बांधकाम विभागाचा प्राथमिक आढावा घेतल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्षांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या दालनात सर्व विभागप्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत २०२२ पासून आतापर्यंतच्या प्रशासकीय कारकिर्दीत सेस फंड किती उपलब्ध होता, त्याचे वितरण कोणत्या कामांसाठी व कुणासाठी झाले, तसेच निधी वाढीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या, याची सविस्तर माहिती २७ मार्चपर्यंत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जिल्हा परिषदेत असलेल्या एकूण १८ विभागांचा आढावा मागविण्यात आला असून, बांधकाम विभागाच्या आढाव्यात अपेक्षित माहिती मिळाली नसल्याने सर्व विभागांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नवीन नेतृत्वाने शिस्तीवरही भर दिला आहे. यापुढे दर सोमवार व गुरुवारी सर्व विभागप्रमुखांनी मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. नागरिकांची कामे प्रलंबित राहू नयेत, यासाठी कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र (आयडी) वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. या निर्णयांमुळे जिल्हा परिषदेत शिस्तीचे नवे संकेत मिळत असल्याची चर्चा आहे.

**बैठकीला गैरहजर शिक्षणाधिकाऱ्यांना नोटीसचा इशारा**

आढावा बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्यावर अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी नाराजी व्यक्त केली. स्वतः उपस्थित राहण्याऐवजी प्रतिनिधी पाठविण्यात आला होता; मात्र त्यांच्याकडे आवश्यक माहिती नव्हती. यावर संतप्त होत अध्यक्ष व उपाध्यक्षांनी जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना दिले. तसेच ते कुठे गेले होते व त्यांनी परवानगी घेतली होती का, याबाबतही स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

# कुळ कायद्यातील जाचक अटींमुळे शेतकरी हवालदिल

## १० टक्के रक्कम भरून जमिनी नावावर करा- आ अभिजीत पाटील



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने कुळ कायद्यात सुधारणा करताना जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून ते राज्य सरकारकडे घेणे आणि प्रक्रियेत होणारा विलंब यांमुळे सर्वसामान्य शेतकरी भरडला जात असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली.

उजनी धरण परिसरातील ६०० हेक्टरहून अधिक जमीन आणि रांजणी, विमाननगर सारख्या वस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी १० टक्के रक्कम भरून घेऊन या जमिनी 'वर्ग-१' मध्ये रूपांतरित कराव्यात, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली.

विधेयकावरील चर्चेत सहभाग घेताना आमदार पाटील म्हणाले की, उजनी धरणासाठी संपादित केलेली मात्र वापरात नसलेली शेकडो हेक्टर जमीन शेतकरी अनेक वर्षांपासून कुळ म्हणून कसत आहेत. ३०-३० वर्षे उलटूनही ही जमीन त्यांच्या मालकीची झालेली नाही. सातबाऱ्यावर 'कुळ' असा उल्लेख असल्याने या शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज मिळत नाही, घरांच्या बांधकामासाठी परवानग्या मिळत नाहीत आणि सामाजिक स्तरावरही या मुलांची लग्ने जमण्यात अडचणी येत आहेत.

ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, यामुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. नुकत्याच सरकारकडून आलेल्या नोटिसांमुळे भीतीपोटी दोन शेतकऱ्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी सभागृहात दिली.

प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवताना आमदार पाटील यांनी स्पष्ट केले की, जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार राज्य सरकारकडे वर्ग केल्यामुळे फाईलींचा प्रवास लांबणार आहे.

मंत्रालयाचे उंबरठे झिजवण्यात शेतकऱ्यांचा वेळ वाया जाईल. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यांकडे हे अधिकार कायम ठेवले तर स्थानिक पातळीवर प्रश्न लवकर सुटतील. अधिकारांचे विकेंद्रीकरण करून जिल्हाधिकाऱ्यांना कालमर्यादा घालून द्यावी, जेणेकरून दोन-तीन महिन्यांत शेतकऱ्यांच्या नावावर जमिनी होतील, असा तोडगा त्यांनी सुचवला.

विमाननगर, रांजणी, सुरली आणि शिराळा यांसारख्या गावांमधील घरांचा आणि शेतीचा प्रश्न या कायद्यामुळे सुटू शकतो.

ज्या कारणासाठी जमीन घेतली होती, त्यासाठी ती वापरली नसेल तर ती मूळ शेतकऱ्याला परत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. केवळ २-४ एकर जमीन असणाऱ्या या अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने या कायद्यातील त्रुटी दूर कराव्यात आणि त्यांना कायमस्वरूपी मालकी हक्क द्यावा, अशी विनंती आमदार अभिजीत पाटील यांनी भाषणाच्या शेवटी केली. त्यांच्या या भूमिकेचे उजनी काठच्या शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे.

# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक सभा उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी (F.Y. B.Tech) विद्यार्थ्यांसाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले.

जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही सभा सर एम. विश्वेश्वरय्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाली.

या कार्यक्रमात प्रथम वर्षाच्या सेमिस्टर-१ विद्यापीठ परीक्षेतील उल्लेखनीय निकालाची माहिती पालकांना देण्यात आली. या परीक्षेत ८ विद्यार्थ्यांनी १० पैकी १० SGPA मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले, तर ५७ विद्यार्थ्यांनी 'ड' ग्रेड प्राप्त केली. तसेच २ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या पहिल्या दहा गुणवंतांमध्ये स्थान मिळवले. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा विद्यापीठ निकालात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या उल्लेखनीय यशाबद्दल उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे प्रोत्साहन आणि सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या कार्यक्रमाला कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, सीआरटीडीचे संचालक डॉ. एस. एच. पवार, जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. के. एस. पाटील तसेच समन्वयक डॉ. ए. ए. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महाविद्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. पालकांनीही या उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शविला.

# वाशिंबे मध्ये विद्युतपंप केबल साहित्याची चोरी

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** उजनी काठावर शेतकऱ्यांच्या विद्युतपंप व जोडलेल्या केबल्स व इतर साहित्याची चोरी झाल्याची घटना वाशिंबे गावातील नांगी चारी येथे घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत नदीवर बसवलेला विद्युतपंपसह केबल्स , स्टार्टर साहित्य कापून नेले आहेत.यामुळे अनेक शेतकऱ्यांना पाणी उपसण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. या घटनेची माहिती शेतकऱ्यांनी करमाळा पोलीसांना दिली असता पोलिसांनी घडलेल्या घटनेची पाहणी केली असून या प्रकरणात पुढील योग्य ती कारवाई केली जाईल असे शेतकऱ्यांना आश्वासन दिले आहे.

करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील पोलमवाडीमध्ये महिन्याभरात दोनदा विद्युत पंपातील तांब्याच्या तारा काढून नेण्याचे घटना घडलेल्या आहेत.यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

# तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणासाठी बीज भांडवल योजना लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाने तृतीयपंथीय घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णय दिनांक १३ मार्च २०२६ नुसार 'बीज भांडवल योजना' राज्यात राबविण्यात येणार असून, या योजनेत तृतीयपंथीय व्यक्तींना स्वयंरोजगार व व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. योजनेत लाभार्थ्याचा ५% हिस्सा, शासनाचे ४५% अनुदान व ५०% बँक कर्ज अशा स्वरूपात मदत मिळणार आहे. लघु (२५,०००), मध्यम (५०,०००) व दीर्घ (२,००,०००) कर्ज सुविधा उपलब्ध असून भाजी स्टॉल, जनरल स्टोअर्स, बेकरी, ब्युटी पार्लर, मोबाइल दुरुस्ती यांसारख्या व्यवसायांसाठी सहाय्य दिले जाईल. याशिवाय कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाचीही सोय करण्यात आली आहे. पात्रतेसाठी अर्जदार महाराष्ट्रात किमान १० वर्षे वास्तव्य असणे, वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असणे, तसेच सक्षम प्राधिकरणाचे तृतीयपंथीय ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी निर्धारित नमुन्यात अर्ज करून आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर कार्यालयात सादर करावा.

या योजनेतून तृतीयपंथीय घटकांना आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाची नवी दिशा मिळणार असल्याचे सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी सांगितले.